# मिरा भाईंदर महानगरपालिका

**अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग**

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८


2021-22 Majhi Vasundhara2

**जा.क्र.मनपा/अवि/336/2023-24** दि. ९/८/2023

## आदेश

विषय :- सन 2023-24 मध्ये सार्वजनिक श्री गणेशोत्सव, नवरात्रौत्सव व इतर उत्सवाकरिता रस्त्यावर/ पथपथावर/ पादचारी मार्गावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- 1) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक 3 : न्यायाप्र 2016/प्र.क्र.127/ (भाग-1)/नवि-17 दि.19/11/2016 व दि.06/03/2017

2) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. याचिका-2018/प्र.क्र.253/ नवि-17 दि.19/09/2019

3) मा. विशेष महासभा दि.22/07/2015 ठराव क्र.38

4) मा. महासभा दि.19/10/2018 ठराव क्र.87

राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक उत्सव/सण/कार्यक्रमाच्या वेळी रस्त्यावर/पथपथावर/पादचारी मार्गावर तात्पुरता मंडप बांधण्या/ उभारण्या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.173/210 श्री महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 10/08/2016, दि.08/02/2018 व दि.25/04/2019 रोजी ओदश दिलेले आहेत. सदर मा. न्यायालयाचे आदेशांच्या अनुषंगाने, राज्य शासनाने संदर्भिय आदेश क्र.1 व 2 अन्वये सार्वजनिक उत्सवाकरिता रस्त्यावर/पदपथावर/पादचारी मार्गावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारणे बाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. तसेच मा. विशेष महासभा, दि.22/07/2015 ठराव क्र. 38 अन्वये याबाबत धोरण निश्चित केलेले आहे. त्यानुसार सन 2023-24 या वर्षा मध्ये सार्वजनिक श्री गणेशोत्सव, नवरात्रौत्सव व इतर उत्सवा करिता रस्त्यावर/ पथपथावर/ पादचारी मार्गावर खालील नमुद कार्यपध्दतीप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात मंडप परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

1) सार्वजनिक उत्सवासाठी सार्वजनिक ठिकाणी मंडप उभारणीसाठी मंडळांनी/संस्थांनी मिरा भाईदर महानगरपालिकेची यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

2) मा. धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणीकृत असलेल्या संस्था सार्वजनिक उत्सवास मंडप परवानगी करिता पात्र राहतील.

3) प्रत्येक प्रभाग समितीमध्ये सार्वजनिक मंडळास/ संस्थेस मंडप उभारणेस परवानगी देणेकरीता एक खिडकी योजने अंतर्गत व्यवस्था करण्याचे निश्चित केलेले आहे. त्याअनुषंगाने संबंधीत प्रभाग समिती कार्यालयाकडे संबंधीत सार्वजनिक मंडळाने अर्ज करणे आवश्यक राहील. सदरचे अर्ज प्रभाग समिती कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर ते तात्काळ ईमेलद्वारे स्थानिक पोलीस ठाणे, वाहतूक शाखा व अग्निशमन विभागाकडे नाहरकत दाखला मिळणेकरीता वर्ग करणे आवश्यक राहील. याबाबत संबंधीत विभागाचा ना हरकत दाखला प्राप्त झाल्यांनतरच मंडप उभारणेस प्रभाग स्तरावर सहा.आयुक्त यांचेमार्फत परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

4) संबंधित प्रभागाचे सहा. आयुक्त यांनी मुदतीत प्राप्त अर्जांवर तातडीने निर्णय घ्यावा. परवानगी नाकारल्यास त्याबाबत संबंधितास त्वरीत लेखी कळविण्यात यावे.

5) सार्वजनिक मंडळास/ संस्थेस प्रस्तावित मंडप/ स्टेजची रुंदी रस्त्याच्या ¼ पेक्षा अधिक असणार नाही या मर्यादेच्या आतील आकारमानाचे मंडप/ स्टेज उभारण्यास परवानगी देण्यात यावी. (सार्वजनिक वाहतुकीस अडथळा येणार नाही व नागरिकांना त्यापासून उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही याची दक्षता संबंधीत मंडळांनी घ्यावयाची आहे.)

6) परवानगी दिल्या व्यतिरिक्त किंवा परवानगी शिवाय मंडप/स्टेज उभारल्यास संबंधीत प्रभागाचे सहा.आयुक्त यांनी स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांच्या मदतीने, अनधिकृत वा वाढीव मंडप/ स्टेज काढून टाकण्यात यावेत. तसेच संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

7) ज्या प्रस्तावित मंडप/ स्टेज इ. उभारणीची जागा ही परिवहन सेवेच्या बस मार्गावर असेल त्या रस्त्यावर मंडप/ स्टेज इ. उभारणेकरीता किमान 12 फुट रुंद जागा ही बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीतील ट्रॅककरीता उपलब्ध राहील, याची दक्षता घेण्यात यावी.

8) संबंधीत मंडळाने मंडप/स्टेज इ. उभारणी करताना ते रोड जंक्शनपासून किमान रस्त्याच्या रुंदीच्या अर्धे याप्रमाणे जंक्शनपासून लांब राहील. जेणेकरुन वाहने वळविणे सोपे होईल अशा पध्दतीने कार्यवाही करावी.

9) कोणत्याही ठिकाणी 8 फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप/ स्टेज इ. उभारणीकरीता परवानगी महानगरपालिकेकडून देण्यात येणार नाही. मंडप/ स्टेज इ. अंतर विद्युत तार व डी.पी. बॉक्स पेक्षा 6 फुट अंतरावर ठेवणे संबंधीत मंडळावर बंधनकारक करण्याच्या अटीवर मंडप उभारणीस परवानगी देणेत यावे.

10) सार्वजनिक उत्सवांकरीता आवश्यक विद्युत कनेक्शन महापालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पोलमधुन घेता येणार नाही. असे आढळून आल्यास संबंधीत मंडळावर दंडात्मक कारवाई करुन त्यांची परवानगी रद्द करण्यात यावी.

11) संबंधित मंडळास मंडप/ स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणाचा सिमेंट कॉंक्रिट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरीता परवानगी देण्यात येवु नये. अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडप/ स्टेज याकरीता आवश्यक असणारे बांबू रोवून त्यापासून अथवा पुर्वनियोजित व्यवस्थापनाप्रमाणे मंडप/ स्टेज याकरीता बांबू रोवण्यात यावेत. रस्ते/ सार्वजनिक खोदाई करुन मंडप/ स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मंडळावर रस्ते अनधिकृतपणे खोदाईबाबत कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

12) सार्वजनिक मंडपाकरिता 15 दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देण्यात येऊ नये.

13) ज्या ठिकाणी पक्क्या स्वरुपाचे रस्ते दुभाजक आहेत, अशा ठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भागातील 12 फुटा व्यतिरिक्त उर्वरित मंडपाची उभारणी संबंधित मंडळाने करावी.

14) संबंधित मंडळाला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासून जास्तीत जास्त 15 मीटर अंतरापर्यंत विद्युत रोषणाई करता येईल.

15) मिरा भाईंदर महानगरपालिका आवश्यकतेनुसार मंडप उभारण्याची परवानगी द्यावी किंवा नाही याबाबत स्वेच्छाधिकार अबाधित ठेवत असल्यामुळे याबाबत अंतिम निर्णय प्रभागाचे सहा. आयुक्त यांच्या स्तरावर घेण्यात यावा. तसेच मंडप/ स्टेज आकार कमी करण्याचे निर्देशसुध्दा मंडळांना देण्यात यावेत.

16) सन 2023-24 मध्ये गणेशोत्सव, नवरात्रौत्सव इ. उत्सावा करीता मंडप उभारण्यास कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारु नये.

17) सार्वजनिक उत्सव मंडळास ध्वनीक्षेपकाची परवानगी संबंधीत स्थानिक पोलीस स्टेशन मधून घेणे बंधनकारक करावे.

18) ध्वनी प्रदुषण तसेच इतर प्रदुषण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची राहील, अशी अट परवानगी पत्रामध्ये नमूद करावी.

19) ध्वनी प्रदुषणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी प्रभाग स्तरावर स्वतंत्र रजिस्टरची व्यवस्था करण्यात यावी. प्राप्त झालेली ध्वनी प्रदुषणाची तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित स्थानिक पोलिस स्टेशनला अग्रेषित करण्यात यावी.

20) सार्वजनिक उत्सव मंडळाच्या प्रवेशद्वारा जवळ एकच बॅनर लावण्याची परवानगी देण्यात यावी. इतर ठिकाणी रस्त्यावर कमान लावणेस व बॅनर प्रदर्शित करणेस प्रतिबंध असल्याने याबाबत योग्य ते नियंत्रण ठेवणेत यावे.

21) मा. उच्च न्यायालयाने समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी उभारण्यात येत असलेल्या तात्पुरत्या मंडपाची तपासणी करण्यासाठी तहसिलदार यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केलेली आहे. संबंधीत समितीमार्फत सार्वजनिक सण/ उत्सव सुरु होण्यापूर्वी किमान 7 दिवस अगोदर पासून उभरण्यात आलेल्या मंडपाची तपासणी करण्यात येते. त्यामुळे सदर समितीस परवानगी दिलेल्या मंडपाची विहित नमुन्यात माहिती देण्यात यावी. तसेच सदर समितीस विनापरवागनी अथवा परवानगी व्यतिरिक्त जास्त आकारचे मंडप आढळल्यास सदरचे मंडप स्थानिक पोलीस प्रशासन मार्फत तात्काळ हटविण्यात यावे. व संबंधीत मंडळावर/ संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

22) विसर्जन स्थळी जाणाऱ्या मार्गावर खानपान व्यवस्थेचे स्टॉल उभरण्यास प्रतिबंध असल्याने याबाबत कोणत्याही प्रकारच्या परवानगी देण्यात येऊ नये.

23) उत्सव कालावधी मध्ये मा. न्यायालयाकडून व राज्य शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी,
प्रभाग समिती क्र. 01, 02, 03, 04, 05 व 06
मिरा भाईंदर महानगरपालिका.

प्रत माहितीस्तव :-
1) अग्निशमन विभाग
2) माहिती व तंत्रज्ञान विभाग
3) माहिती जनसंपर्क विभाग
4) सर्व स्थानिक पोलीस ठाणे, मिरा भाईंदर शहर
4) वाहतूक पोलीस ठाणे, काशिमिरा